**CNR No :- MHSI100000822026**

खटला दाखल तारीख – २७/०२/२०२६.
खटला नोंदणी तारीख – २७/०२/२०२६.
निकाल तारीख – १२/०५/२०२६.
कालावधी – वर्षे : महिने : दिवस.
०० : ०२ : १५.

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय, दोडामार्ग.**
**ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग.**

(पीठासीन अधिकारी वाय. पी. बावकर)
(अधिघोषित दिनांक – १२.०५.२०२६)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५५/२०२६
निशाणी क्र. ०६ लगत

प्रथम खबर अहवाल गुन्हा क्रमांक – २२०/२०२५, दि.२९.१२.२०२५.
निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, सिंधुदुर्ग.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार, नि.रा.उ.शु.भ.प.सिंधुदुर्ग. |
| सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्री. ए. व्ही. पेडणेकर |
| आरोपी | देवेंद्र नारायण धर्णे, वय ५७ वर्षे, धंदा – शेती, रा. घर क्र. ३६३, खैराटवाडी, साटेली भेडशी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग. |
| आरोपीतर्फे वकील | श्री. बी. व्ही. नाईक. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २९.१२.२०२५ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २९.१२.२०२५. |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २७.०२.२०२६. |
| गुन्ह्याचा दोषारोप नोंदवल्याची तारीख | ०२.०४.२०२६. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १६.०४.२०२६. |
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | १२.०५.२०२६. |
| न्यायनिर्णय तारीख | १२.०५.२०२६. |
| शिक्षा सुनवल्याची तारीख, असल्यास | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा क्र. | आरोपीचे नाव | आरोपीच्या अटकेची तारीख | आरोपीची जामीनावर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुद्ध निश्चीत करण्यात आलेले गुन्हे | आरोपींची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरवण्यात आले | आरोपीस सुनावण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार संपरीक्षेच्या कालावधीमध्ये आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | देवेंद्र नारायण धर्णे | निरंक | ०२.०४.२०२६. | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

याकामी अभियोगपक्षाने आरोपींविरूध्दचे दोषारोप शाबीत करण्याकरीता खालीलप्रमाणे एक साक्षीदार तपासला.

अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | रवी राजाराम जानकर | फिर्यादी |

ब) बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :-

| साक्षीदाराचा क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी

अ) अभियोग पक्ष :-

| अ.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| ०१. | P1/PW-1 | दि.२९.१२.२०२५ रोजीची फिर्याद. |

ब) बचाव पक्ष :-

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क) न्यायालयीन निशाणी :-

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड) मुद्देमाल तपशील :-

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## -: न्यायनिर्णय :-

(दिनांक १२ मे, २०२६ रोजी घोषित केला)

अभियोग पक्षाने आरोपीच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ कलम ६५(ई) च्या गुन्ह्यासाठी प्रकरण चालविले आहे.

०२. आरोपीची **नि.क्र.०६** येथे संक्षिप्त संपरिक्षा नोंदविली, त्याने गुन्हा अमान्य केला व अभियोग चालविण्याची विनंती केली.

०३. सदर कामी दाखल असलेले दोषारोपपत्र, अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेला साक्षीदार, लेखी व तोंडी पुरावा यावरून खालील मुद्दे माझे अवलोकनार्थ समोर येतात. सदरचे मुद्दे, त्यांचे निष्कर्ष व त्यावरील कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.२९.१२.२०२५ रोजी दोडामार्ग तालुक्यातील गाव मौजे साटेली भेडशी खैराटवाडी येथील घर क्र. ३६३ च्या आजुबाजुच्या परीसरात १०:१५ वा. चे सुमारास दारुबंदी गुन्हयांतर्गत छापा घातला असता घराच्या मागील पडवीत आरोपीच्या ताब्यात गोवा बनावटी दारुच्या हनीग्रेड ब्रॅन्डीच्या १८० मिली मापाच्या ३५ सिलबंद प्लॅस्टीकच्या बाटल्या असा मुद्देमाल मिळुन आला व सदरचा मद्यनिषेध मुद्देमाल गैरकायदा व विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने बाळगुन आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| २. | अंतिम आदेश काय ? | आरोपीची अंतीम आदेशान्वये निर्दोष मुक्तता करणेत येते. |

**–:: <u>कारणमिमांसा</u> ::–**

०४. अभियोगपक्षास पुरावा सादर करण्याची उचीत संधी उपलब्ध करुन देऊनही अभियोगपक्ष पुरावा सादर करण्यास अपयशी ठरल्याने दि.२३.०४.२०२६ रोजीच्या नि.क्र.०१ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१(१)(ब) अन्वये निवेदन दि.३०.०४.२०२६ रोजी नोंदविण्यात आले. आरोपीने त्याला खोट्या गुन्ह्यात अडकविल्याचा बचाव घेतला आहे.

<u>मुद्दा क्र. १</u> –

०५. अभियोग पक्षाने आरोपी विरुद्ध गुन्हा शाबीत करण्याकरीता साक्षीदार क्र.०१ फिर्यादी रवी जानकर यांची साक्ष नोंदविली. त्यांनी साक्षीपुराव्यात, दि.२९.१२.२०२५ रोजी सकाळी ०७:०० वा. मिळालेल्या बातमीनुसार दोन पंचासह साटेली भेडशी, खैराटवाडी, ता. दोडामार्ग येथे खाजगी वाहनाने जाऊन घर क्र. ३६३ येथे छापा घातला असता आरोपीच्या ताब्यातील पॉलीथीनच्या पिशवीमध्ये हनीब्रेड कंपनीच्या १८० मिली मापाच्या ३५ सीलबंद दारुच्या बाटल्या मिळून आल्याचे कथन केले. त्यांनी साक्षीपुराव्यात, मुद्देमालापैकी ०२ बाटल्या नमुना म्हणुन बाजुला काढुन त्यावर पंचांच्या सह्यांचे लेबल लावण्यात आले व उर्वरीत मुद्देमाल पंचनाम्यांतर्गत जप्त करण्यात आले व आरोपी विरुद्ध फिर्याद दाखल केल्याचे कथन करुन सदरची फिर्याद **नि.क्र.P1/PW1** वर न्यायकक्षात ओळखली.

०६. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणी फिर्यादी रवी जानकर (स.सा.क्र.१) याच्या साक्षीचे परीक्षण केले असता, साक्षीदाराने आरोपीकडून गोवा बनावटीच्या दारूच्या बाटल्या जप्त केल्याचे सांगितले असले तरी मुद्देमालाचा प्रकार हा हनीब्रेड असा कथन केलेला आहे व दोषारोपपत्रामध्ये हनीग्रेड असा मुद्देमालाचा प्रकार दिसुन येतो. त्याचप्रमाणे किती वाजता छापा घातला, आरोपीने कथीत गुन्हा केव्हा केला, गुन्हा घडल्याची वेळ याबाबत काहीही कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये अनेक

महत्त्वाच्या त्रुटी व विसंगती समोर आलेल्या आहेत. साक्षीदाराने स्पष्टपणे मान्य केले आहे की, मिळालेल्या गुप्त माहितीची खात्री करण्यासाठी कोणतेही बनावट गिऱ्हाईक पाठविण्यात आले नव्हते. त्यामुळे आरोपी प्रत्यक्ष अवैध दारू विक्री करीत होता याबाबत कोणताही स्वतंत्र किंवा प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध होत नाही. तसेच, सदर पंच हे पोलिसांचे नेहमीचे पंच असल्याचे साक्षीदाराने मान्य केले आहे. परिणामी, पंच साक्षीची निष्पक्षता व स्वतंत्रता संशयास्पद ठरते. याशिवाय, घटनास्थळ हे बाजारपेठेतील वर्दळीचे ठिकाण असल्याचेही साक्षीदाराने मान्य केले आहे; मात्र अशा ठिकाणी असूनही कोणत्याही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे जप्तीची कारवाई स्वतंत्र साक्षीने समर्थित होत नाही. तसेच घटनास्थळाच्या मालकीबाबत, घर क्रमांकाबाबत किंवा मालमत्तेच्या नोंदीबाबत कोणतीही खातरजमा छाप्यापूर्वी करण्यात आली नव्हती, हे देखील साक्षीदाराने मान्य केले आहे. त्यामुळे आरोपीचा घटनास्थळाशी व मुद्देमालाशी असलेला संबंध ठोसपणे सिद्ध होत नाही.

०७. सर्वात महत्वाची बाब म्हणजे अभियोग पक्षाने प्रस्तुत कामामध्ये रासायनिक पृथःकरण अहवाल दाखल न केल्याने आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल इथाईल अल्कोहोल म्हणजेच प्रतिबंधीत द्रव्य आहे हे अभियोग पक्षातर्फे सिध्द करणेत आलेले नाही. तसेच, याकामी जप्त करणेत आलेला मुद्देमालही न्यायालयासमोर हजर करणेत आलेला नाही. सबब, तोच मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून पंचासमक्ष जप्त केला हे निःसंशयरित्या शाबीत झाले असे

म्हणता येणार नाही.

०८. अभियोगपक्षाने आरोपी विरुद्धचा गुन्हा संशयापलीकडे जाऊन शाबीत करणे आवश्यक असताना प्रस्तुत गुन्हा संशयापलीकडे जाऊन सिद्ध केलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा आरोपीस दोषी धरण्याइतपत पुरेसा नाही. सबब, सबळ पुराव्याअभावी आरोपीस दोषी धरता येत नाही व तो निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र. १ करीता "**नकारार्थी**" उत्तर देत आहे.

**मुद्दा क्र. ०२ –**

०९. प्रस्तुत कामातील जप्त करणेत आलेला दोषारोपपत्रातील अ.क्र. ०१ कडील मुद्देमाल नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सिंधुदुर्ग यांचेकडे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम १०० अन्वये पाठविणे न्यायोचित आहे. माझ्या वरील विवेचनावरुन न्यायालयासमोर आलेला पुरावा हा आरोपी विरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे जाऊन शाबित करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे:–

**–: आ दे श :–**

१. आरोपी देवेंद्र नारायण धर्णे, वय ५७ वर्षे, रा. घर क्र. ३६३, साटेली भेडशी, खैराटवाडी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) नुसार दाखल दोषारोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक व जामीनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. दोषारोपपत्रातील नमूद अ.क्र.०१) गोवा बनावटी दारुच्या हनीग्रेड ब्रॅन्डीच्या १८० मिली मापाच्या ३५ सिलबंद प्लॅस्टीकच्या बाटल्या हा जप्त मुद्देमाल अपील कालावधी पूर्ण झाल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करणेसाठी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, सिंधुदुर्ग यांच्याकडे पाठविणेत यावा.

४. उपरोक्त नमुद मुद्देमाल ठेवण्याकरीता वापरण्यात आलेली पॉलीथीनची पिशवी हा मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधी पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार नाश करण्यात यावा.

५. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये वैयक्तिक बंधपत्र रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) चे द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषीत केला.)

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.05.12 13:39:14 +0530

ठिकाण – दोडामार्ग.
दिनांक – १२.०५.२०२६.

(वाय. पी. बावकर)
न्यायदंडाधिकारी वर्ग – १, दोडामार्ग.

**प्रमाणपत्र**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | नरेंद्र गोविंद प्रभु. |
| न्यायालय | न्यायदंडाधिकारी वर्ग–१, दोडामार्ग |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | १२.०५.२०२६. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेचा दिनांक | १२.०५.२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केलेचा दिनांक | १२.०५.२०२६. |